पनवेल महानगरपालिका

समाज विकास विभाग

स्वारस्याची अभिव्यक्ती सुचना

पनवेल महानगरपालिकेमार्फत सामाजिक उत्तरदायीत्वाच्या जाणिवेतुन महानगरपालिका क्षेत्रात खालील नमुद ठिकाणी जेष्ठ नागरिकांकरीता विरंगुळा केंद्रे तयार करण्यात आलेली असून सदर विरंगुळा केंद्रे ज्येष्ठ नागरिकांच्या नोंदणीकृत संस्था/असोसिएशन यांना व्यवस्थापन व परिचालनाकरिता सुरुवातीस एक वर्षाच्या कालावधीसाठी खालील अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या नोंदणीकृत ज्येष्ठ नागरिक संस्था/असोसिएशन यांना नाममात्र भाडे तत्वावर (रक्कम रु. १५०/- प्रति महिना) चालविण्यास देणेकरिता Offline प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	नोड	सेक्टर	भुखंड क्र.
१	खारघर	२१	४२
२	खारघर	१९	१६९A
३	खारघर	१९	१३२
४	खारघर	१५	३६
५	खारघर	१५	२५
६	कळंबोली	१० ई	१६ ते २१
७	कळंबोली	५	३
८	कळंबोली	२ ई	१०
९	कळंबोली	६	११
१०	कळंबोली	६ ई	२
११	कळंबोली	१०	१७
१२	कामोठे	२०	२८+३५+३६
१३	कामोठे	५	४५
१४	कामोठे (खांदा कॉलनी)	६	९
१५	नविन पनवेल (पश्चिम)	९	२३
१६	नविन पनवेल (पूर्व)	१४	०९
१७	नविन पनवेल(पूर्व)	१३	१३
१८	नावडे (तळोजा)	१४	९२
१९	नावडे (तळोजा)	९	६

अटी व शर्ती :-

१) जेष्ठ नागरिक संस्था ही मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० व सार्वजनिक संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत किंवा यथास्थिती प्रचलित कायद्याने नोंदणीकृत संस्था असावी.

२) सदर संस्था पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक प्रभागातील असावी.
३) जेष्ठ नागरिक संस्थेतील सभासदांची सविस्तर यादी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
४) अर्जासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे स्वसाक्षांकित (Self Attested) केलेली असावीत.
५) संबंधित विरंगुळा केंद्र ज्या विभागात / प्रभागात स्थित आहे, त्या स्थानिक प्रभागातील वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिक सदस्य असलेल्या तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे विधिवत नोंदणीकृत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनेस विरंगुळा केंद्र चालविण्याकरिता प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
६) विरंगुळा केंद्र इमारतीची महापालिकेस गरज असल्यास सबंधित संस्थेस सदरच्या केंद्रांची इमारत महापालिकेस तात्काळ उपलब्ध करून द्यावी लागेल.
७) स्वारस्य अभिव्यक्ती सुचनेस अनुसरून दाखल झालेले प्रस्ताव अंशत: अथवा पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मा.आयुक्तांना असतील.
८) संस्थेच्या त्यावर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरिता मुदतवाढ देणे अथवा करारनामा रद्द करणेबाबतचा अंतिम निर्णय मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा असेल.

आवश्यक कागदपत्रे :-

१) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२) संस्थेचे संविधान / नियमावली
३) संस्थेच्या अध्यक्ष, खजिनदार व सचिव यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड
४) संस्थेचे अलीकडील वार्षिक अहवाल व हिशेब
५) संस्थेच्या कार्यकारिणी सदस्यांची यादी
६) ज्येष्ठ नागरिकांसाठी केलेल्या कामाचा अनुभवाचा दाखला
७) पनवेल हद्दीमध्ये सदरची संस्था कोठे कार्यरत आहे याचा संपूर्ण पत्ता

वरील अटी व शर्ती पुर्ण करणा-या पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संस्थांनी दिनांक ०७/१२/२०२६ पर्यंत समाजविकास विभाग, तळमजला विभाग, पीरकरम अली, प्राथमिक शाळा क्रमांक १०, पाटकर वाडा, पनवेल महानगरपालिका या ठिकाणी आपले प्रस्ताव सादर करावेत. उशीरा सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

Digitally signed by
MEGHMALE MAHESHKUMAR VAIJANATHRAO
Date: 27-11-2026 15:38:09

(महेशकुमार मेघमाळे)
अतिरिक्त आयुक्त - II
पनवेल महानगरपालिका